<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.

-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-

दिनांक: 09/12/2016.

नवी मुंबई महानगरपालिकेची <u>डिसेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, सोमवार, दिनांक 19 डिसेंबर 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता</u> बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील <u>राजमाता जिजाऊ सभागृह</u> येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

1. इतिवृत्त.
2. प्रश्नोत्तरे.
3. स्थायी समिती सदस्य पदाच्या रिक्त झालेल्या एका जागेवर नव्याने सदस्याची नेमणूक करणे.

<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>

4. तुर्भे क्षेपणभूमी येथे सहावा सेल MSW (M & H) Rule 2016 प्रमाणे विकसित करणे.
5. ऐरोली सेक्टर 15, भूखंड क्र. 22ए येथे बांधण्यात आलेल्या "डॉ. बाबासाहेब आंबेडकर" स्मारकाच्या डोमला मार्बल आच्छादन (Cladding) करणे.

<u>ठरावाच्या सूचना</u> :

6 ते 8. श्रीम. संगिता अशोक पाटील, यांजकडून :-

(6) प्रभाग क्र.15, सेक्टर-15 आंबेडकर भवनच्या समोरील ऐरोली मुलुंड हा मुख्य रस्ता आहे. हा रस्ता नवी मुंबईचे प्रवेशद्वार आहे. तरी सदर मुख्य रस्त्यावर नवी मुंबईची ओळख तसेच ऐरोलीच्या नाव लौकीकात भर पडेल असे भव्य दिव्य प्रवेशद्वार उभारणे. (7) प्रभाग क्र.15, सेक्टर 16 मधील स्व.आण्णासाहेब पाटील यांच्या पुतळयाचे व उदयानाचे सुशोभिकरण करणे. (8) प्रभाग क्र.15, सेक्टर-16 मधील अंतर्गत रस्त्यांची फार दुरावस्था झाली असून सेक्टर-16 मधील अंतर्गत रस्त्यांचे काम करणे.

9 व 10. श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-

(9) प्रभाग क्र. 83, जुईनगर मधील शाळा क्र. 17 येथे निरनिराळया सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी तसेच स्वतंत्रता दिनाचे वेळी विद्यार्थ्यांना झेंडावंदना नंतर पावसाळयात सुरक्षितपणे पुरेसे कार्यक्रम करण्यासाठी शाळेच्यावर सिमेंट कॉंक्रिटचे स्लब टाकून एक सभागृह बनविणे. (10) प्रभाग क्र. 83, जुईनगर मधील बरेच फुटपाथ खराब झाले आहेत नागरिकांना त्यावरुन चालणे मुश्किल झाले आहे तरी सदर फुटपाथची तात्पुरती डागडुजी न करता सर्व खराब फुटपाथ नव्याने बनवून प्रभाग सुशोभिकरणास सहाय्य करणे.

11 ते 13. श्रीम. हेमांगी अंकुश सोनावणे, यांजकडून :-

(11) प्रभाग क्र.17, सेक्टर 4, ऐरोली येथे उच्चदाब विद्युत वाहिनी खालील नवीन विकसित झालेल्या उद्यानास दिवाबत्तीची सोय करणे. (12) प्रभाग क्र. 17, सेक्टर-4, ऐरोली येथील उच्चदाब विद्युत वाहिनी खालील उद्यानात सद्यस्थितीत असलेल्या जॉगींग ट्रक वाढत्या लोकसंख्येच्या मानाने अपुरे पडत आहे. तरी सदर उद्यानात नवीन जॉगींग ट्रकचे काम करणे. (13) प्रभाग क्र.17, सेक्टर 4, ऐरोली येथील उच्चदाब विद्युत वाहिनी खालील उद्यानात गजेबो व ओपन जीमचे काम करणे.

14 ते 16. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून:-

(14) प्रभाग क्र. 1, ईश्वरनगर येथील विद्युत वायर भुमिगत करणे अत्यंत गरजेचे आहे. सदर वायर नागरिकांच्या घरावरुन गेल्या असल्याने अनेक अपघात झाले असुन, 2 नागरीकांचा मृत्यू देखील झाला आहे. तरी प्रभाग क्र 01 ईश्वरनगर येथील विद्युत वायर भुमिगत करणे. (15) प्रभाग क्र. 1, ईश्वरनगर येथील रस्ते, पदपथ व गटारांची अत्यंत दुरावस्था झाली असुन प्रभागातील उर्वरीत रस्ते, पदपथ व गटारांची दुरुस्ती व नव्याने बनविणे. (16) प्रभाग क्र. 1, ईश्वरनगर येथील नागरिकांची नागरी आरोग्य केंद्र, पालिकेची शाळा, व्यायामशाळा, व इतर नागरी सुविधा अभावी प्रचंड गैरसोय होत असुन, सिडकोकडून गट क्र. 40 हा बहुउद्देशीय इमारती करिता पालिकेने हस्तांतरीत करुन त्या ठिकाणी बहुउद्देशीय इमारत बांधणे.

17. श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-

प्रभाग क्र. 29, घणसोली-2 मधील म्हात्रे आळी येथील "नवजवान चौक" पासून ते बाळारामवाडी पर्यंत मलनि:स्सारण वाहिन्या टाकल्या नाहीत त्या टाकण्यात याव्यात तसेच महादेवाचीवाडी येथील भागीरथी अपार्टमेंट पासून जय श्रीनगर येथे मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे.

18 ते 20. श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-

(18) प्रभाग क्र. 76, सानपाडा येथील कारशेडच्या बाजुने नवरत्न सोसायटी ते उड्डान पुलापर्यंत रस्ता व रेल्वे ट्रक यांच्यामध्ये संरक्षक भिंत किंवा तार कंपाऊंड बांधणे (19) प्रभाग क्र. 76, सानपाडा येथील सेक्टर 2 मधील ओरीएंटल कॉलेज मैदान व महापालिकेचे मैदान यामध्ये संरक्षक भिंत बांधणे. (20) प्रभाग क्र. 76, सानपाडा मधील कामगार नेते मा. टि. एस. बोराडे उद्यान नव्याने विकसीत करणे.

21. श्रीम. मंदाकिनी रमाकांत म्हात्रे, यांजकडून :-

नवी मुंबई महानगरपालिका मासळी मार्केट इमारतीमधील ओटले / गाळे भाडेतत्वावर देणेबाबतच्या महानगरपालिकेच्या माहे ऑगस्ट 2014 चा ठराव क्रमांक 840 अन्वये घेतलेल्या निर्णयाचा महानगरपालिका याद्वारे फेरविचार करीत आहे.

| | |
|---|---|
| 22 ते 24. श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-<br>(22) प्रभाग क्र. 35, घणसोली वसाहतीला लागून असणाऱ्या मोठया नाल्यामध्ये असणारा गाळ काढून साफसफाई करावी व नाल्याची पुर्नबांधणी करुन त्या नाल्यालगत संरक्षक भिंत उभारणे. (23) प्रभाग क्र. 35, घणसोली येथील ओमकार व श्री गणेश सोसायटीला लागून असणारे सर्कल छोटे करुन विकसीत करणे. (24) प्रभाग क्र. 35, घणसोली विभागामधील नागरी वसाहत क्षेत्राला लागून वाहणाऱ्या मोठया नाल्यालगत नागरिकांसाठी जॉगींग ट्रॅक करणे.<br>25 ते 27. श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-<br>(25) प्रभाग क्र. 55, सेक्टर 11 येथे जॉगींग ट्रॅकच्या बाजूला मोकळया जागेवर नागरिकांची ओपन जीमची मागणी आहे. तरी ओपन जीमची व्यवस्था करणे. (26) प्रभाग क्र. 55, सेक्टर 11 येथे नाल्यालगत असलेल्या सर्व्हिस रोडला नवीन LED स्ट्रीट लाईट बसविणे. (27) प्रभाग क्र. 55, खैरणे गांव येथे स्मशानभूमी लगत असलेला रस्ता अतिशय अरुंद आहे. नागरिकांच्या मागणीनुसार रस्त्याचे रुंदीकरण करणे.<br>28 ते 30. श्री. अशोक बाबुराव. गुरखे, यांजकडून :-<br>(28) प्रभाग क्र. 102, सी.बी.डी. सेक्टर 09 येथील एकता गार्डन व रॉक गार्डन मध्ये खुल्या व्यायाम शाळेचे साहित्य बसविणे. (29) प्रभाग क्र. 102, सी.बी.डी. सेक्टर 01 येथील आण्णाभाऊ साठे उद्यान, सेक्टर 09, लेन क्र. 1 व पिपल्स शाळेच्या मागील बाजूस असलेल्या भिंतीची दुरुस्ती करणे (30) प्रभाग क्र. 102, सी.बी.डी. सेक्टर 01अे येथील डॉ. मोरलवार क्लिनीक ते बिल्डींग नं. सी 5/6 पर्यंतच्या गटाराची दुरुस्ती करणे.<br>31 ते 33. श्रीम. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-<br>(31) प्रभाग क्रमांक 85, कुकशेत गांव, अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करण्यात आली असून उर्वरित रस्त्यांची सुधारणा करणे. (32) प्रभाग क्रमांक 85, कुकशेत गांव येथे 6 मीटर रस्त्याच्या बाजूस असलेले दोन्ही बाजूच्या पदपथामधील एक बाजूचे पदपथ काढून हेव्हीड्युटी (रोडलेवल) गटर बनविणे. (33) प्रभाग क्रमांक 85, कुकशेत गांव, सारसोळे सेक्टर-6, पामबीच सर्व्हिस रोड मुख्य चौक व रस्त्यालगत सी.सी.टि.व्ही. यंत्रणा बसविणे.<br>34 ते 36. श्रीम. जयश्री एकनाथ ठाकूर, यांजकडून :-<br>(34) प्रभाग क्रमांक 86, सारसोळे गांव कंत दर्शन दरबार मार्गाची डांबरीकरणाने सुधारणा करणे. (35) प्रभाग क्रमांक 86, सारसोळे नमुंमपा शाळा ते प्रवासी मोटर्स व प्रवासी मोटर्स ते देवम स्वीट्स समोरील इमारती पर्यंतच्या गटारांची व पदपथांची सुधारणा करणे. (36) प्रभाग क्र. 86, सारसोळे गांवमधील चारही प्रवेशठिकाणी प्रवेशद्वारांची उभारणी करणे.<br>37 ते 39. श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-<br>(37) प्रभाग क्रमांक 27, तळवली नाका येथील गोल्डन नगर, हनुमान नगर, छत्रपती शिवाजी नगर, महेंद्रनगर, तळवली नाका येथ पदपथ व गटारांची दुरूस्ती करून सुधारणा करणे. | (38) प्रभाग क्रमांक 27, तळवली नाका, घणसोली अर्जुनवाडी येथील अंतर्गत रस्त्यांची दुरूस्ती करून सुधारणा करणे. (39) प्रभाग क्र. 27, तळवली नाका येथे अंतर्गत भागात दिवाबत्तीची सोय करणे.<br>40 ते 42. श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-<br>(40) प्रभाग क्रमांक 64, वाशी, सेक्टर-1ए, येथील एन.एम.एस.ए. ग्राउंडलगतच्या परिसरात पावसाळ्यांत खूप पाणी जमा होते व मैदानातील पाणी मुख्य गटारात जाण्यासाठी गटार बांधण्यात यावे, तरी सेक्टर-1ए, एन.एम.एस.ए. ग्राऊडलगत नवीन गटार बांधणे. (41) प्रभाग क्रमांक 64 अंतर्गत, वाशी सेक्टर-8 येथील आयप्पा मंदिर शेजारी असलेले पावसाळी पाणी जाण्यासाठी असलेले गटार याची दुरावस्था व मोडकळीस आलेले आहे व पावसाळ्यात या परिसरातील पाण्याचा निचरा होत नाही. तरी सेक्टर-8 येथील आयप्पा मंदिरालगत नवीन गटार बांधणे. (42) प्रभाग क्र. 64, वाशी सेक्टर-6, 7 व 8 येथील उद्यान जेष्ठ नागरिक व प्रभागातील रहिवाशांना बसण्याकरिता गजेबो बांधणे.<br>43 ते 45. श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-<br>(43) प्रभाग क्र. 79, सानपाडा, सेक्टर 10, रो-हाऊस विभागात रो-हाऊस नंबरचे दर्शक फलक लावणे. (44) प्रभाग क्र. 79, सानपाडा येथील संत शिरोमणी उद्यान सेक्टर 7, जैन मंदिराच्या मागे मोकळा भूखंड आहे. त्या भूखंडावर हॉलीबॉल कोर्ट बनविणे. (45) नवी मुंबई महानगरपालिकेत पेपर लेस कारभार करण्यासाठी नगरसेवकांना शहर अभियंता विभागामार्फत टॅब देणे.<br>46 ते 48. श्रीम. अंजली अजय वाळुंज, यांजकडून :-<br>(46) प्रभाग क्र. 62 मध्ये सेक्टर 15/16 वाशी येथील मिनाताई ठाकरे उद्यानात ओपन जीमची उभारणी करणे. (47) प्रभाग क्र. 62 मध्ये सेक्टर 15/16 व 16अ वाशी मधील सर्व नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यानांमध्ये व मैदानांमध्ये बोअरवेलचे नियोजन करणे. (48) प्रभाग क्र.62, वाशी सेक्टर 16ए, एम.टी.एन.एल. च्या बाजूलाच नवी मुंबई महानगरपालिकेने वाहन तळ बांधले आहे. तरी एम.टी.एन.एल. लगत असलेले टॅक्सी पार्किंग कायमस्वरूपी हटविणे.<br>49 ते 51. श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-<br>(49) प्रभाग क्र. 95, नेरूळ मधील पंडित रामा भगत उद्यानामध्ये लहान मुलांची खेळणी तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे तेथे लहान मुलांना गंभीर इजा होण्याची शक्यता आहे. तरी सदर उद्यानात नवीन खेळणी बसविणे. (50) प्रभाग क्र. 95, नेरूळ मधील पूनम टॉवर ते डी 84 पर्यंत गटर व पदपथाची दुरूस्ती करणे. (51) प्रभाग क्र. 95, नेरूळ मधील ठाकूर बळीराम मढवी यांच्या घरापासून ते कृष्णा गणू पाटील यांच्या घरापर्यंतच्या गटार व पदपथाची दुरूस्ती करणे.<br>52 ते 54. श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-<br>(52) प्रभाग क्र. 101 मधील आग्रोळी गावातील हिरकणी बिल्डींग समोरील चौकात हायमास्ट लाईट बसविणे. |

(53) प्रभाग क्र. 101 मधील आग्रोळी गाव उड्डाण पुलाखालील समाज हॉलमध्ये स्थानिकांना खेळण्यासाठी बडमिंटन, टेबल टेनिस गेम व इतर इनडोअर गेम सुरू करणे. (54) प्रभाग क्र. 101 मधील आग्रोळी गाव उड्डाण पुलाखालील मोकळ्या जागेवर (ओपन स्पेस मध्ये) स्थानिक युवकांना व्यायाम करण्यासाठी व्यायाम शाळा किंवा ओपन जीम बसविणे.

55 ते 57. श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-

(55) प्रभाग क्र. 92 दारावे गांव येथील अंकुश भोईर यांच्या घरापासून ते निशिकांत म्हात्रे यांच्या घरापर्यंत तसेच हरीभाऊ नाईक यांच्या घरापासून ते आत्माराम भोईर यांच्या घरापर्यंतचे गटर व पदपथ अत्यंत खराब व नादुरूस्त झाले आहेत. त्यामुळे नागरीकांना तेथून जाण्या येण्यासाठी फार त्रास होत आहे. तरी सदर गटर व पदपथाचे नव्याने बांधकाम करणे. (56) प्रभाग क्र. 92 येथे जेष्ठ नागरिकांसाठी विरूंगुळा केंद्र नसल्याने नेरूळ सेक्टर 23 जीईएस येथील भूखंड क्र. 181 सिडकोकडून हस्तांतरीत झालेल्या भूखंडावर जेष्ठ नागरिकांसाठी विरूंगुळा केंद्र बांधणे. (57) प्रभाग क्र. 92 येथील संत गाडगेबाबा उद्यान (रॉक गार्डन) ची संरक्षक भिंत नादुरूस्त झालेली आहे. तरी सदर उद्यानाची संरक्षक भिंत दुरूस्त करून रंगरंगोटी करणे.

58 ते 60. श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-

(58) प्रभाग क्र. 53, नोड 1 जुहूगाव सेक्टर 11 व सेक्टर 12 येथे सी.सी.टि.व्ही कमेरे लावणे. (59) प्रभाग क्र. 53, नोड 1 जुहूगाव सेक्टर 12 येथे विरूंगुळा केंद्र बांधणे. (60) प्रभाग क्र. 53, नोड 1 जुहूगाव सेक्टर 12 येथील होल्डींग पाँड जवळ शौचालय बांधणे.

61 ते 63. श्रीम. शिल्पा सुर्यकांत कांबळी, यांजकडून :-

(61) प्रभाग क्र. 88 मधील सेक्टर 11 येथील टक्सीस्टड अंतर्गत असलेले गटर व जागेची स्थिती अंत्यत दयनीय आहे. तरी तेथे पेव्हर ब्लॉक बसविणे अथवा डांबरीकरण करणे. (62) प्रभाग क्र. 88 मधील एन.एल. 4, सुरज अपार्टमेंट, सेक्टर 3 नेरूळच्या बाजूस असलेल्या वाचनालयाची अवस्था अंत्यत दयनीय झाली असुन त्या जागेवर विरंगुळा केंद्र बांधणे. (63) प्रभाग क्र. 88, नेरूळ सेक्टर 3 अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे.

64 ते 66. श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-

(64) प्रभाग क्र. 96 नेरूळ मधील सेक्टर-16ए, 16 व 18 येथील नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम सेवेचे बसथांबे अधिक आकर्षक करणे. (65) प्रभाग क्र. 96 नेरूळ मधील सेक्टर-16ए येथील शाळा क्रमांक. 8 व 9 शाळेमधील मैदानात लाल माती टाकण्यात यावी व आवश्यकतेनुसार सदर मैदान सुशोभित करणे. (66) प्रभाग क्र. 96, नेरूळ मधील सेक्टर - 16ए येथील शाळा क्र. 8 व 9 समोरील रस्त्याचे डांबरीकरण करणे.

67 ते 69 श्रीम. पुजा गणेश मेढकर, यांजकडून :-

(67) प्रभाग क्र. 71, हनुमान नगर येथील शंकर मंदिर परिसरातील पदपथ व गटारे दुरूस्ती करणे. (68) प्रभाग क्र. 71, हनुमान नगर येथील बगाडे कंपनीच्या मागच्या बाजूच्या परिसरातील पदपथ व गटारे दुरूस्ती करणे. (69) प्रभाग क्र. 71, हनुमान नगर येथील कै. ओंकार सिंग धुमाजी मेढकर, विदयालय येथील परिसराचे सुशोभिकरण करणे.

70 ते 72. श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-

(70) प्रभाग क्र. 23, ऐरोली से. 09 व 10 येथील प्रमुख मार्गावर दिशादर्शक फलक लावणे. (71) प्रभाग क्र. 23, ऐरोली से.09 येथील एच.पी गस गोडाऊन जवळील चौक हा रहदारीचा आहे. तसेच लगतच्या गस गोडाऊन, लॉजिस्टीक कंपनी, डी मार्ट मुळे या मार्गावर अवजड वाहनांची वाहतुक असते. यामुळे चौकाची दुरावस्था झाल्याने सदर चौकाची कॉंक्रीटीकरण करणे. (72) प्रभाग क्र. 23, ऐरोली से. 09 येथील डी मार्ट ते एच. पी. गस गोडाऊन जवळील चौकापर्यंत स्कायवॉक बांधणे.

73 ते 75. श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-

(73) महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये आवश्यक असणारे न्युरॉलॉजिस्ट डॉक्टर हे महापालिकेच्या वेतन पटलावर तसेच निश्चित कालावधीसाठी मानधनावर नियुक्त केलेले नाही. त्यामुळे गरीब गरजू नागरीकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहून मरण यातना भोगाव्या लागतात. याची दखल घेऊन मनपा ज्याप्रमाणे रस्ते, इमारती व अन्य सुविधांसाठी व्यावसायीक सेवा सल्लागारांना, संस्थांना करोडो रूपये सेवा शुल्क मेहनताना देऊन सेवा घेते त्याप्रमाणेच आरोग्य सेवा सुविधा पुरविणाऱ्या खाजगी व्यावसायिक संस्थाकडून वैद्यकीय सल्लागार या तत्वावर मनपा रुग्णालयांतील विशिष्ट विभागासाठी विशेषतज्ञ डॉक्टरांची कायमस्वरूपी सेवा उपलब्ध करण्याची तरतूद करणे. (74) सिडकोने शहर विकासासाठी अवश्यक असणाऱ्या मुलभुत निकषांच्या आधारे नवी मुंबई शहर नियोजन आराखडयात विकसित होणाऱ्या नवी मुंबई शहरातील प्रत्येक विभागाची संभाव्य लोकसंख्या विचारार्थ घेऊन खेळाची मैदाने, मनोरंजन मैदाने, उदयाने इ. सार्वजनिक सेवा सुविधांसाठी भूखंडांचे आरक्षण निश्चित केलेले आहे. अशा भुखंडांचा ताबा सिडकोकडून घेण्यासाठी मनपाने कार्यवाही करावी आणि त्या कालावधीत आरक्षित भूखंडांच्या वापराच्या स्वरूपात व आकारमानात बदल, सुधारणा होऊ नयेत याकरीता नवी मुंबई शहराची नियोजन प्राधिकरण म्हणून मनपाने शासन तसेच न्यायालयीन स्तरावरून मनाई आदेश प्राप्त करणे. (75) नवी मुंबई शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील जागा वापराच्या आरक्षणाच्या स्वरूपात बदल करण्यास मंजूरी देण्याच्या तरतूदी या सदोष त्रुटीयुक्त असल्याचे आदरणीय सर्वोच्च न्याय यंत्रणेच्या निर्णयादेशाने महापालिकेचे अधिकार सिमीत झाले आहेत का? त्यामुळे नवी मुंबई महापालिका क्षेत्रात आजवर झालेल्या शहरीकरणातून आगामी काळात लगतच्या क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाकरीता सेवा सुविधा उपलब्ध करून देताना नवी मुंबई शहराच्या होणाऱ्या संभाव्य विकासास व मनपाच्या महसूली उत्पन्नात वाढ करण्याच्या प्रयत्नांना खिळ बसण्याची शक्यता आहे. या गोष्टी विचारार्थ घेऊन महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मनपास जागा वापराच्या आरक्षणाच्या स्वरूपात बदल करण्यास मंजूरी देण्याच्या अधिकाराची तरतूद समाविष्ट करण्यासाठी न्यायालयाची तसेच शासनाची मंजूरी मिळविण्याकरीता आवश्यक अशा उपाय योजना व कार्यवाही करणे.

| | |
|---|---|
| 76 ते 78. श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-<br>(76) प्रभाग क्र. 45, मधील संपुर्ण रस्त्यांचे डांबरीकरण करून स्पीड ब्रेकर बसविणे. (77) प्रभाग क्र. 45, मधील सर्व पावसाळी गटारांची दुरूस्ती करणे. (78) प्रभाग क्र. 45, मधील बहुउददेशीय भूखंड विकसीत करणे.<br>79 ते 81. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-<br>(79) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने नवी मुंबई महानगरपालिका हददीतील अनेक धार्मिक स्थळे, प्रार्थना स्थळे तोडण्याचे काम चालू आहे, ते तात्काळ थांबवावे व ज्या धार्मिक स्थळांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे अशा संस्थेकडुन जागेचा मोबदला अल्प दरात भरुन घेणे. (80) प्रभाग क्र.12 सेक्टर 2 या ठिकाणी जुने नागरी आरोग्य केंद्र होते. त्या जागेवर बहुउददेशीय इमारत बांधण्याचे ठरविले आहे. त्यासाठी नागरी आरोग्य केंद्र सेक्टर 2 मधील समाज मंदिरात हलविण्यात आली होती. परंतु समाज मंदिराची दुरुस्ती नसल्याकारणाने पावसाळयात समाज मंदीर 100 टक्के गळत होते. | त्यामुळे पावसाळयात नागरी आरोग्य केंद्र सेक्टर-3 मधील माता बाल रुग्णालय या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले. त्यामुळे सेक्टर-1, 2, 3 येथील रुग्णांना माता बाल रुग्णालयाचे किमान 3 ते 4 किलोमीटर अंतर पार करावे लागत असुन रुग्णांची खुप प्रमाणात गैरसोय होत आहे. तसेच सेक्टर-2 मधील बहुउददेशीय इमारतीचे बांधकाम खुप संथ गतीने चालु असुन ते तात्काळ जोरात करण्यात यावे व समाज मंदिराची दुरुस्ती करुन नागरी आरोग्य केंद्र समाज मंदिरात लवकरात लवकर स्थलांतरीत करणे. (81) प्रभाग क्र.12 सेक्टर- 2 मधील घरे, एल.आय.जी सिस्टिम मधील आहेत. त्या ठिकाणी A, B, C, D, E असे ग्रुप आहेत. त्या ठिकाणावरील ड्रेनेज सिस्टिम ही सिडको कालीन असुन सध्यस्थितीत ड्रेनेज सिस्टिम ना दुरूस्त झालेली असून ड्रेनेज सिस्टिमचा खर्च हा सर्व सामान्य जनतेला न परवडण्यासारखा आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिकेने ही ड्रेनेज सिस्टिम दुरुस्ती करणे. |

मा. महापौरांच्या आदेशावरून,

सही/-
(चित्रा बाविस्कर)
महानगरपालिका सचिव,
नवी मुंबई महानगरपालिका.

महापालिका सचिव कार्यालय,
नवी मुंबई महानगरपालिका,
दिनांक 09 डिसेंबर 2016.